ट्रान्स हार्बर लिंक होणारच

■ ८० टक्के कर्जासाठी जपानी बँकेचा कौल

■ प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षणही झाले...

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

शिवडी ते न्हावा शेवा या २२ किमी मार्ग उभारण्याच्या आशा पुन्हा निर्माण झाल्या असून प्रकल्प खर्चाच्या ८० टक्के म्हणजे सुमारे ८८०० कोटी रुपयांचे कर्ज देण्याबाबत जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेने (जायका) सकारात्मक कौल दिला आहे. त्यादृष्टीने प्रस्तावित मार्गाचे प्राथमिक सर्वेक्षणही करण्यात आले आहे.

'जायका'तील तज्ज्ञांच्या पथकाने एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी या प्रकल्पाबाबत नुकतीच चर्चा केली. या प्रकल्पासाठी ११ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यास 'जायका'कडून कर्ज मिळेल, अशी अपेक्षा एमएमआरडीएचे आयुक्त युपीएस मदान यांनी व्यक्त केली. यापूर्वी, कोणत्याही कंपनीने निविदेस प्रतिसाद न दिल्याने एमएमआरडीएचा अपेक्षाभंग झाला होता. त्याचवेळी हा प्रकल्प 'बांधा, वापरा' तत्त्वावर न करता कंत्राट देऊन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. इंजिनीअरिंग, प्रोक्युरमेंट आणि कॉण्ट्रॅक्ट (ईपीसी) या तत्त्वावर आता हे काम केले जाईल आणि त्यात भारतीय तसेच परदेशी कंपन्यांही सहभागी होतील, अशी आशा मदान यांनी व्यक्त केली.

'जायका'च्या प्रतिनिधींनी या प्रकल्पाची माहिती घेतली. दोन दिवसांच्या सत्रात त्यांनी तांत्रिक आणि आर्थिक गोष्टींवर चर्चा केली. या प्रकल्पाचा सखोल अभ्यास करून त्यानंतर कर्जाबाबत निर्णय होईल. यापूर्वी, 'जायका'ने एमएमआरडीएच्या कुलाबा ते सीप्झ या तिसऱ्या मेट्रो मार्गासाठी कर्ज मंजूर केले आहे. बांधकामाचा दर्जा सुधारणे, तसेच बांधकामाच्या काळात बचत करणे, याबाबत समुद्रात पूल बांधणीचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या जपानी तज्ज्ञांकडून एमएमआरडीएला मार्गदर्शन मिळणार आहे. 'जायका'चे अधिकारी लवकरच या प्रकल्पाबाबतचा अहवाल सादर करणार असल्याचेही मदान म्हणाले.